| CNR No.MHWR040016842018 | नोंदणी दिनांक | – | ११/१२/२०१८ |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | – | ११/१२/२०१८ |
| | निकाल दिनांक | – | ११/०३/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०७ ०३ ०० |

**निशाणी क्र.२६**

**नमुना क्र.३२**

**पार्ट-अ**

**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**

**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

**सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**

**ता. सेलु, जि. वर्धा**

**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**

न्यायनिर्णय घोषीत दिनांक ११/०३/२०२६

**(नियमित फौजदारी खटला क्र.१२२/२०१८)**

गुन्हा नोंद क्र. २१३/२०१८, पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि.वर्धा

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पो.स्टे.सिंदी रेल्वे. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्रीमती व्ही.एम.गजभिये |
| **आरोपी** | १. | **धुलिचंद उर्फ शिवा सागरदास साठवने**<br>वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | २. | **राजु बारकंदजी कटरे**<br>वय – ३६ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>दोघे राहणार – वार्ड क्र.१६, पिपरा रोड, सिंदी रेल्वे, ता. सेलु, जि. वर्धा. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | श्री. बी.डब्लू.चौधरी |

## भाग – ब

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १९/०८/२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २०/०८/२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ११/१२/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०६/०८/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०६/०८/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | धुलिचंद उर्फ शिवा सागरदास साठवने | २३/०८/२०१८ | २७/०८/२०१८ | भा.दं.वि. कलम ३६३ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | राजु बारकंदजी कटरे | २३/०८/२०१८ | २७/०८/२०१८ | भा.दं.वि. कलम ३६३ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.**

अ. अभियोग पक्ष

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | कल्पना कवडुजी विरखेडे | फिर्यादी | २२ |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

न्यायालयीन साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही | | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.२३ | फिर्यादीची तोंडी रिपोर्टवरील अंगठयाला |
| २. | निशाणी क्र.२४ | छापील प्रथम खबरी अहवालावरील सहीला |
| ३. | निशाणी क्र.२५ | घटनास्थळ पंचनामा |

ड. भौतीक वस्तु -

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | २८/२०१८ | एक जुनी वापरती कुर्ती अमरेला पॅटर्नची काळया रंगाची |
| २. | | एक काळया रंगाचे लोअर ज्यावर लाल रंगाच्या उभ्या पट्टया असलेले |
| ३. | | एक अबोली रंगाची जुनी वापरती बॉडीफ्राक |
| ४. | | एक फिक्कट काळया रंगाची जुनी वापरती कट साईज निकर |
| ५. | | एक पांढ-या क्रिम रंगाचे फुल बाहीचे शर्ट |
| ६. | | एक जुना वापरता काळया रंगाचा फुलपॅंट |
| ७. | | एक काळया रंगाची बीनी बाहीची बनियाण |
| ८. | | एक निळया रंगाची डी.एम.आर. कंपनीची अंडरवेअर |
| ९. | | एक फिक्कट जांभळया बारीक चेक्सचे फुलशर्ट |
| १०. | | एक काळया रंगाचा पिवळा बारीक सेंडींगचा फुलपॅंट |
| ११. | | एक सेंदरी रंगाची बाहीची जुनी वापरती बनियाण |
| १२. | | एक कथीया रंगाची डी.एम.आर. सुप्रिम कंपनीची अंडरवेअर |

# न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक : ११/०३/२०२६)**

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३६३ सहकलम ३४ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे** –

२. दि.१९/०८/२०१८ रोजी रविवार असल्याने फिर्यादीची मुलगी ही घरी होती. फिर्यादी व तिचा मुलगा सकाळी ०९.०० वाजता शेतमजुरीचे कामाकरिता गेले होते. तसेच सायंकाळी ०६.०० वाजता कामावरुन घरी आले होते. त्यावेळी तिची मुलगी ही घरीच होती. ते घरी

आल्यानंतर मुलीने त्यांना चहापाणी दिला व स्वयंपाक केला. त्यानंतर संध्याकाळी ०७.३० वाजता फिर्यादीची मुलगी ही चप्पल घालुन बाहेर निघाली व फिर्यादीला म्हणाली की, मी बाहेरुन येते. त्यानंतर ते जेवण वगैरे करुन ०९.०० वाजेपर्यंत मुलीची वाट पाहली. परंतु ती घरी परत आली नाही. म्हणून फिर्यादीने व तिच्या मुलाने मोहल्लयात फिरुन माहिती घेतली असता आरोपी क्र.१ शिवा सागरदास साठवने हा सुद्धा घरुन निघुन गेल्याचे समजले. आरोपी क्र.१ हा नेहमी फिर्यादीचे घरासमोरुन येता जाता फिर्यादीच्या मुलीकडे संशईत नजरेने पाहत होता. त्यामुळे आरोपी क्र.१ ने तिच्या मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याचा फिर्यादीला संशय आला. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे रिपोर्ट दिली. सदरची तक्रार पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे अपराध क्र.२१३/२०१८ भारतीय दंड विधानाचे कलम ३६३ सहकलम ३४ अन्वये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. चंद्रभान शिवशंकर मेघरे यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला. वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. आरोपींना अटक केली व अटक फार्म तयार केले. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्यांचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपींविरुद्ध दोषारोप निश्चीत करुन त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखविला व त्यांना मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात

आला. आरोपींनी तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपींविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत कोणताही मजकूर अभिलेखावर आला नाही त्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये तसेच आरोपींतर्फे विद्वान वकील बी.डब्लू.चौधरी यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय दिनांक १९/०८/२०१८ रोजी ०९.३० ते २१.०० वाजताच्या दरम्यान वार्ड क्र.१६, सिंदी रेल्वे, तालुका सेलू व जिल्हा वर्धा येथे आरोपींनी आपसांत संगनमतकरुन फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचे तिच्या कायदेशीर पालकांच्या संमतीशिवाय अपहरण केले, म्हणून आरोपींनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३६३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी** |
| **२.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त.** |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द वर नमुद गुन्हे सिध्द करण्यासाठी फक्त एक साक्षीदार तपासले आहे. अभियोगपक्षाने आरोपी वरील दोषारोपीत गुन्हे सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ कल्पना कवडुजी विरखेडे (फिर्यादी) हिला निशाणी क्र.२२ वर तपासले आहे.

७. अभियोगपक्षाने आरोपींवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी आरोपींनी आपसांत संगनमतकरुन फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचे तिच्या कायदेशीर पालकांच्या संमतीशिवाय अपहरण केले, हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दा क्र.१ करीता :</u>**

८. अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी कल्पना कवडुजी विरखेडे (फिर्यादी) हिला निशाणी क्र.२२ यांना तपासले आहे. तिने तिच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ती आरोपींना ओळखते. आरोपींविरुद्ध तिने गैरसमुजतीने फिर्याद दिली होती. तिच्या मुलीचे लग्न झाले असुन ती आता हेलोडी येथे तिच्या पतीसोबत सुखाने संसार करीत आहे. आता तिला आरोपींविरुद्ध कोणतेही तक्रार नाही. तिला सदरची फिर्याद व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आली, त्यावर तिचा अंगठा असुन त्यातील मजकूराबाबत तिला काहीही माहित नसल्याचे कथन केले. सदरील साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत

नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी तिचा उलटतपास घेतला. त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले आहे की, दि.१९/०८/२०१८ रोजी संध्याकाळी ०७.३० वाजताच्या सुमारास तिची मुलगी गौरी ही बाहेरुन येते असे सांगुन गेली परंतु ती पुन्हा घरी आली नाही. म्हणून तिने चौकशी केली असता तिला वस्तीतील लोकांकडुन तिची मुलगी व आरोपी शिवा साटोणे हे सिंदी रेल्वे येथील सोनमाता मंदिर जवळुन निघुन गेल्याचे समजले. अभियोगपक्षास साक्षीदाराचा उलटतपासात आरोपींविरुध्द उपयुक्त असा कोणताही मजकूर अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपींवरील गुन्हा शाबित करण्यास पुरेशी नाही.

९. उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३६३ चा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला तिचे कायदेशीर पालकांच्या संमतीशिवाय अपहरण केले परंतु असे फिर्यादीने सांगितले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे कोणती घटना घडली होती यावर विश्वास बसत नाही. जरी प्रस्तुत प्रकरणात घटनास्थळ पंचनामा आरोपींनी मान्य केले असले तरी सदरचा गुन्हा सिध्द होण्याकरिता फिर्यादीने साक्ष दिलेली नाही. त्यामुळे घटना घडली होती किंवा नाही असे ठामपणे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे अभियोगपक्षाने

तपासी अधिकारी व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपींवरील आरोप सिध्द करण्यास सपशेल अपयशी ठरला आहे. तसेच आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३६३ सहकलम ३४ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत :**

**१०.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपींविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ **धुलिचंद उर्फ शिवा साठवने** व आरोपी क्र.२ **राजु बारकंदजी कटरे** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र. २१३/२०१८ भारतीय दंड संहितेचे कलम ३६३ सहकलम ३४ पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. अपराध क्र. २१३/२०१८ (पोलीस स्टेशन मालमत्ता क्र. २८/२०१८) मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमाल हा मुल्यहीन

असुन अपील कालावधी संपल्यानंतर कायदेशिररित्या विल्हेवाट करण्यात यावा.

४. आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/- चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI Date: 2026.03.12 10:29:49 +0530

(एस.आर.सातभाई)

**दिनांक** : ११/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेलू

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)